**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मनूपात्रा ®**

मनू/*एससी* /०३८२/१९८३

**समतुल्य उद्धरण:** एआयआर१९८३एससी३७८, १९८३ क्रिएलजे६४२, १९८३(१)क्राईम्स६०२(एससी), १९८३(१)एससी एएलई१४०, (१९८३)२एससीसी९६, [१९८३]२एससीआर३३७.

**भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालया समक्ष.**
रीट याचिका (फौजदारी ) क्रमांक १०५३-१०५४ ऑफ १९८२
निर्णीत दिनांक - १५/०२/१९८३
याचिकाकर्ते - **शीला बारसे**
**-विरुद्ध-**
उत्तरवादि - **महाराष्ट्र राज्य**

**माननीय न्यायमूर्ति / न्यायमंच - ए. एन. सेन , पी. एन. भगवती आणि आर. एस. पाठक, न्यायमूर्ति.**

**वकील :**
अपीलकर्ता / याचिकाकर्ता / वादी करीता : वकील सलमान खुर्शीद,

उत्तरवादि / प्रतिवादी करीता : के. सी. भगत, सॉलिसिटर जनरल, व्ही. बी. जोशी आणि एम.एन.श्रॉफ, वकील.

**न्यायनिर्णय**

1. मुंबई शहरात पोलीस कोठडीत असतांना महिला कैद्यांना कोठडीत हिंसेची तक्रार करणाऱ्या पत्रकार शीला बारसे यांनी लिहिलेल्या पत्रावर ही रिट याचिका आधारित आहे. याचिकाकर्त्याने आपल्या पत्रात म्हटले आहे की, त्यांनी ११ ते १७ मे १९८२ च्या दरम्यान तुरुंग महानिरीक्षकांच्या परवानगीने मुंबई मध्यवर्ती कारागृहातील पंधरा महिला कैद्यांची मुलाखत घेतली होती आणि त्यांच्यापैकी पाच कैद्यांनी पोलिस कोठडीत पोलिसांकडून मारहाण झाल्याचे त्यांना सांगीतले होते. याचिकाकर्त्याने पोलिसांकडून मारहाण झाल्याची तक्रार करणाऱ्या या पाच जणांपैकी विशेषतः देवम्मा

आणि पुष्पा पाईन या दोघींना पोलीस कोठडीत असतानां झालेल्या मारहाण आणि छळाबद्दलच्या प्रकरणांचा उल्लेख केला आहे. पोलीस कोठडीत महिला कैद्यांना देण्यात आलेल्या गैरवर्तणुकीच्या विविध आरोपांची आणि विशेषतः देवम्मा आणि पुष्पा पाईन यांचा करण्यात आलेला छळ आणि करण्यात आलेली मारहाण यांच्याशी संबंधित विविध आरोपांची चौकशी करणे हे या रिट याचिकेच्या हेतूने आवश्यक नाही कारण महाराष्ट्र राज्याच्यावतीने विवादित केलेल्या या आरोपांच्या अचूकतेची चौकशी करण्याचा आमचा प्रस्ताव नाही. परंतु, हे आरोप याचिकाकर्त्याने मुलाखत घेतलेल्या महिला कैद्यांनी आणि विशेषत: देवम्मा आणि पुष्पा पाईन यांनी केले असल्याने आणि याचिकाकर्त्यांसारख्या पत्रकाराला महिला कैद्यांनी त्यांना सांगितलेले आरोप त्या शोधून काढतील किंवा खोटे तयार करतील असे मानण्याचे कारण नाही म्हणून या न्यायालयाने याचिकाकर्त्याचे पत्र रिट याचिका म्हणून ग्राह्य मानले आणि महाराष्ट्र राज्य, कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह आणि पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र यांना सदर रीट याचिका मान्य करण्यात का येऊ नये याकरिता नोटीस जारी केल्या. असे दिसून येते की ज्यांना कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आल्या होत्या त्यापैकी कोणत्याही पक्षाच्या वतीने कारणे दाखवा नोटीसच्या परत येण्याच्या तारखेला, प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले नाही आणि आणि त्यामुळे या न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या पत्रात केलेल्या कथनाला उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र राज्य आणि इतर पक्षकारांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी रिट याचिकेची सुनावणी पुढे ढकलली. या दरम्यान, या न्यायालयाने डॉ. (कु.) ए. आर. देसाई, संचालक सामाजिककार्य महाविद्यालय, निर्मला निकेतन, मुंबईच्या यांनी मुंबई मध्यवर्ती कारागृहाला भेट देऊन मुलाखतीच्या वेळी तेथे इतर कोणीही उपस्थित नसतांना तेथे असलेल्या देवम्मा आणि पुष्पा पाईनसह अन्य महिला कैद्यांची मुलाखत घेण्याचे व त्यांना कोणत्याही प्रकारची गैर-वर्तणूक किंवा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अत्याचार झाला आहे की नाही याची निश्चिती करून 30 ऑगस्ट 1982 रोजी किंवा त्यापूर्वी या न्यायालयात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. राज्य सरकार आणि

कारागृह महानिरीक्षकांना डॉ. कु. ए. आर. देसाई यांच्याकडे सोपवलेली ही जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्व सुविधा पुरवण्याचे निर्देश देण्यात आले. डॉ. कु. ए. आर. देसाई यांना हे सदर कार्य नेमून देण्याचा उद्देश याचिकाकर्त्याच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे अत्याचार आणि गैरवर्तनाचे आरोप देवम्मा आणि पुष्पा पाईनसह महिला कैद्यांनी याचिकाकर्त्याकडे केले आहेत का आणि अशा आरोपांच्या संदर्भात सत्य काय आहे याची तपासणी करणे हा होता. या न्यायालयाच्या आदेशानुसार डॉ. कु. ए. आर. देसाई यांनी मुंबई मध्यवर्ती कारागृहाला भेट दिली आणि तेथे कैद असलेल्या महिला कैद्यांची मुलाखत घेऊन या न्यायालयाला सविस्तर अहवाल सादर केला. महिला कैद्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि अडचणींची माहिती देणारा हा अहवाल अतिशय चितवेधक आणि मार्गदर्शक सामाजिक-कायदेशीर दस्ताऐवज आहे आणि डॉ. कु. ए. आर. देसाई यांनी इतका विस्मयकारक सखोल आणि आकलनीय अहवाल सादर करताना घेतलेल्या त्रासाबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. मुंबई मध्यवर्ती कारागृह किंवा महाराष्ट्रातील इतर तुरुंगांमधील परिस्थितीशी आम्हाचा थेट संबंध नाही कारण याचिकाकर्त्याच्या पत्रातील प्राथमिक प्रश्न पोलिस कोठडीतील महिला कैद्यांच्या सुरक्षिततेशी आणि अत्याचार आणि गैरवर्तनापासून त्यांचे संरक्षणाशी संबंधित आहे. तथापि, आम्ही महाराष्ट्राच्या कारागृहांच्या महानिरीक्षकांना डॉ. कु. ए. आर. देसाईंनी तयार केलेला हा अहवाल पाहण्याची आणि मुंबई मध्यवर्ती कारागृह आणि महाराष्ट्रातील इतर कारागृहांची स्थिती सुधारण्यासाठी आणि महिला कैद्यांचे आयुष्य सहज सहन करण्यायोग्य आणखी काय पावले उचलणे आवश्यक आहे याचा विचार करण्याची ठामपणे शिफारस करू. या रिट याचिकेत फक्त एकच मुद्दा आहे ज्याबद्दल आम्ही निर्देश देऊ इच्छितो आणि तो म्हणजे केवळ महिला कैद्यांनाच नव्हे तर महाराष्ट्रातील तुरुंगात असलेल्या सर्व कैद्यांना कायदेशीर मदत पुरवण्याची गरज आहे, असे या याचिकेत म्हटले आहे. या न्यायालयास या पूर्वी संधी मिळाली आहे आणि न्यायालयाने दिलेल्या अनेक निर्णयांमध्ये यापूर्वीच हे स्पष्ट केले आहे की, एखादा गरीब किंवा निर्धन आरोपी ज्याला अटक करून त्याचा जीव किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य

धोक्यात आणले त्याला कायदेशीर मदत देणे हि केवळ अनुच्छेद ३९ द्वारे नव्हे तर घटनेच्या अनुच्छेद १४ आणि अनुच्छेद २१ द्वारे देखील अनिवार्य घटनात्मक आवश्यकता आहे. न्यायमिळण्याच्या बाबतीत ते आवश्यक आहे आणि जेथे ते दिले जात नाही, तेथे अन्याय होण्याची शक्यता असते आणि निर्विवादपणे अन्यायाच्या प्रत्येक कृतीने लोकशाही आणि कायद्याच्या नियमांचा पाया कमकुवत होण्याची शक्यता आहे, कारण अन्यायाच्या भावनेपेक्षा मानवी अंतःकरणात दुसरे काहीही खुपत नसते आणि ज्यांना त्रास सहन करावा लागतो आणि ज्यांना कायदेशीर व्यवस्थेतून किंमत मोजावी लागल्यामुळे न्याय मिळू शकत नाही त्यांचा कायदेशीर कार्यवाही वरून विश्वास उडतो आणि लोकशाही आणि कायद्याचे राज्य या केवळ श्रीमंत आणि शक्तिशाली लोकांचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी आणि सत्तास्थापनेचे आणि निहित स्वार्थांचे रक्षण करण्याच्या हेतूने केलेल्या घोषणा काल्पनिक कथा आहेत, अश्या भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ लागतात. तुरुंगात बंद असलेल्या कैद्याच्या असहाय्य्य स्थितीची कल्पना करा, जो त्याच्या संरक्षकांच्याहातून झालेल्या छळ आणि अत्याचार आणि जाच या विरुद्ध स्वतःचे संरक्षण करण्याकरिता किंवा त्याचे सत्यत्व स्थापित करण्याकरीता किंवा घटनात्मक किंवा कायदेशीर अधिकारांचे रक्षणाकरिता कोणाकडे मदत मागावी हे त्याला माहित सुद्धा नसते. हे देखील शक्य आहे की त्याला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याला इतर समस्या असू शकतात ज्याला कायदेशीर सहाय्यतेचि आवश्यकता असेल परंतु त्याला तुरुंगात टाकण्यात आल्याच्या कारणास्तव, त्याला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना योग्य कायदेशीर सल्ला किंवा मदत मिळणे अश्यक्य नाही परंतु कठीण होऊ शकते. त्यामुळे तुरुंगातील कैद्यांना कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे, मग ते न्यायचौकशी अधीन कैदी असोत किंवा सिद्धअपराधी कैदी.

2. डॉ. कु. ए. आर. देसाई यांचा अहवाल असे दर्शवितो की महिला कैद्यांना कायदेशीर मदत पुरविण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही आणि आम्ही ठामपणे असे

सांगण्याचे धाडस करतो की महिला कैद्यांना कायदेशीर मदत पुरविण्याच्या बाबतीत जी परिस्थिती प्रचलित आहे तीच परिस्थिती पुरुष कैद्यांच्या बाबतीतही असायला हवी. डॉ. कु. ए. आर. देसाई यांच्या अहवालात असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की बॉम्बे मध्यवर्ती कारागृहातील दोन कैदी, एक 'जर्मन' नागरिक आणि दुसरा 'थाई' नागरिक यांची मोहन अजवानी नावाच्या वकिलाने ठगवून फसवणूक करून जर्मन नागरिकाचे जवळपास निम्मे सामान आणि थाई नागरिकांचे दागिन्यांचा फी भरण्यासाठी अशा वस्तू आणि दागिने ठेवत आहे अशी सबब सांगून अफरातफर केली. या दोन 'जर्मन' आणि 'थाई' महिला कैद्यांनी केलेले आरोप खरे आहेत की नाही हे आम्हाला माहित नाही, पण जर हे खरे असेल तर ही वकिली व्यवसायासाठी अतिशय लाजिरवाणी बाब आहे आणि याची सखोल चौकशी करण्याची गरज आहे. कायद्याचा व्यवसाय हा एक अभिजात व्यवसाय आहे ज्याला नेहमीच सामाजिक सेवेची एक शाखा मानले गेले आहे आणि एखाद्या वकिलाचे समाजाप्रती कर्तव्य आहे की त्याने संकटात सापडलेल्या लोकांना मदत करावी आणि विशेषतः संकटात सापडलेल्या जेव्हा महिला असतात आणि त्या तुरुंगात असतात. वकिलांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, कायदा हा कायदेमंडळाने बनवलेल्या नियमांचा केवळ यांत्रिकी अर्थ लावण्यापुरता मर्यादित नसतो, तर तो बहुतांश मानवी अस्तित्वाच्या वाहतुकीचा खुला मार्ग आहे. या वाहतुकीत अनेक जण जखमी झाले आहेत आणि समर्पण आणि सेवेच्या भावनेने या जखमींना मदत करणे हे वकिली व्यवसायाचे कार्य आहे. कायदेशीर मदतीशिवाय अजूनही जे बळी पडतात आहे अश्यांची संख्या कमी करणे हे वकिलांचे काम आहे. जे गरीब, निरक्षर आणि दुर्लक्षित आहेत आणि ज्यांना जेव्हा गुन्हेगारी किंवा अटक किंवा तुरुंगासारख्या संकटात टाकले जाते, तेव्हा त्यांना काय करावे, कुठे जावे किंवा कोणाकडे जावे हे कळत नाही अश्यावेळी मानवतेच्या दृष्टिकोनातून वकिलांनी सकारात्मक भावनेने त्यांच्या पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. जर वकिलांनी संकटात सापडलेल्या लोकांच्या मदतीसाठी पुढे येण्याऐवजी त्यांचे शोषण करून त्यांचा गैरफायदा घेतला तर वकिली व्यवसायाची  बदनामी होईल आणि

देशातील मोठ्या प्रमाणात लोकांचा वकीलांवरील विश्वास उडेल आणि ते लोकशाही आणि कायद्याच्या नियमासाठी विनाशकारी ठरेल. जर हे खरे असेल कि या दोन 'जर्मन' आणि 'थाई' कैद्यांना मोहन अजवानी यांनी पूर्वी अभिकथित केल्याप्रमाणे वागणूक दिली असेल तर या प्रश्नावर आम्ही आपले कोणतेही एकतर्फी मत व्यक्त करू इच्छित नाही, तर ते  तीव्र निषेधास पात्र आहे. त्यामुळे डॉ. कु. ए. आर. देसाई यांच्या अहवालाच्या परिच्छेद ९.२ मध्ये नमूद केल्यानुसार जर्मन आणि थाई या दोन महिला कैद्यांनी केलेल्या आरोपांबाबत योग्य वाटेल अशी कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बार कौन्सिलकडे पाठवण्यात यावेत असे आम्ही निर्देश देऊ.

3) मात्र, ही घटना तुरुंगातील कैद्यांना कायदेशीर मदत पुरवण्यासाठी यंत्रणा स्थापन करण्याची गरज आहे असे अधोरेखित करते. सुदैवाने महाराष्ट्र राज्यात  उच्च न्यायालय आणि जिल्हा स्तरावर महाराष्ट्र विधी सेवा समिती आणि कायदेशीर सल्लागार मंडळाने समित्या स्थापन केल्या आहेत. त्यामुळे आम्ही महाराष्ट्र कारागृह महानिरीक्षक यांना  महाराष्ट्रातील सर्व पोलीस अधीक्षकांना एक परिपत्रक जारी करण्याचे निर्देश देत आहोत.

(१) जेथे तुरुंग आहे त्या जिल्ह्याच्या विधी सेवा समितीला सर्व खटल्यातील न्यायचौकशीअधीन कैद्यांची ज्यामध्ये तुरुंगातील कैद्यांच्या प्रवेशाची तारीख आणि त्यांच्यावर लावण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या आरोपांची शक्य तितकी तपशीलवार माहिती आणि पुरुष कैदी आणि महिला कैद्यांना स्वतंत्रपणे दर्शविणारी यादी पाठविणे.

(२) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 41 अंतर्गत संशयित म्हणून अटक करण्यात आलेल्या व्यक्तीं जे १५ दिवसांपेक्षा पासूनच्या कालावधीपासून तुरुंगात आहेत अशी माहिती देणारी यादी संबंधित जिल्हा विधी सेवा समितीला सादर करणे.

(३) संबंधित जिल्हा विधी सेवा समितीने नियुक्त केलेल्या वकिलांना तुरुंगात प्रवेश करण्यासाठी आणि ज्या कैद्यांनी त्यांची मदत घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे त्या कैद्यांची मुलाखत घेण्यासाठी सुविधा पुरविणे.

(४) संबंधित जिल्हा विधी सेवा समितीने नियुक्त केलेल्या वकिलांना कारागृहातील कैद्यांबाबत आवश्यक ती सर्व माहिती देणे.

(५) संबंधित जिल्हा विधी सेवा समितीने नियुक्त केलेले वकील विशिष्ट दिवशी तुरुंगाला भेट देतील आणि ज्या कैद्यांना त्यांची मदत घ्यायची असेल ते कैदी त्यांना भेटू शकतील आणि त्यांच्या समुपदेशन सेवांचा लाभ घेऊ शकतील अशी नोटीस कारागृहातील प्रमुख ठिकाणी लावणे.

(६) संबंधित जिल्हा विधी सेवा समितीने नियुक्त केलेल्या वकिलांची मुलाखत घेण्याची आणि भेट घेण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही कैद्याला कायदेशीर मदतीची गरज असलेल्या कोणत्याही प्रकरणाबाबत मुलाखतीची परवानगी देणे जी मुलाखत तुरुंग अधिकाऱ्याच्या नजरेसमोर परंतु ऐकण्याबाहेरची असावी.

4. आम्ही कारागृहांच्या महानिरीक्षकांना दिलेल्या या निर्देशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य विधी सेवा समिती आणि सल्ला मंडळ ज्या जिल्ह्यांमध्ये तुरुंग आहेत त्या जिल्ह्यांच्या जिल्हा विधी सेवा समित्यांना जिल्हा न्यायालयात वकिली करणाऱ्या नामनिर्देशित वकीलांना किमान पंधरवड्यातून एकदा तरी जिल्ह्यातील तुरुंगाला किंवा तुरुंगांना भेट देण्यासाठी सूचित करतील जेणेकरून सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्राच्या उच्च न्यायायात जामीन अर्ज करण्याच्या अधिकारासह कैद्यांच्या अधिकाराबाबत आणि कायदेशीर मदत मिळण्याचा अधिकार योग्य प्रकारे आणि प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे की नाही याची खातरजमा

करणे आणि ज्या कैद्यांनी कायदेशीर सहाय्य मिळण्याची इच्छा व्यक्त केली आहे त्यांची मुलाखत घेणे आणि त्यांना आवश्यक असेल त्याप्रमाणे कायदेशीर सहाय्य प्रदान करणे व जामीन किंवा अभिवचन रजे वर कैद्याला सोडण्यासाठी अर्ज करणे आणि त्यांना न्यायालयांमध्ये पुरेसे कायदेशीर प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे, दोषसिद्धी आणि कायदेशीर सहाय्य यांच्या विरोधात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करणे किंवा तयार करणे आणि त्यांना किंवा त्यांच्या कुटुंब सदस्यांना भेडसावणाऱ्या इतर समस्यांबाबत सल्ला देणे. महाराष्ट्र राज्य कायदेशीर मदत आणि सल्ला मंडळ आम्ही दिलेल्या या निर्देशांची योग्य रीतीने अंमलबजावणी होत आहे हे सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा विधी सेवा समित्यांकडून वेळोवेळी नियतकालिक अहवाल मागवेल. आम्ही महाराष्ट्र विधी सेवा सहाय्य मंडळाला, प्रति वकील कारागृहातील प्रत्येक भेटीसाठी कोर्ट हाऊस ते तुरुंग आणि परत जाण्याचा वाजवी प्रवास खर्चासह २५ रु. मानधन देण्याचे निर्देश देऊ. मुंबई शहरात जिल्हा विधी सेवा सहाय्य समिती नसल्यामुळे जिल्हा विधी सेवा समितीच्या जागी उच्च न्यायालय कायदेशीर मदत समितीची स्थापना करून हे निर्देश अंमलात आणले जातील. आम्ही निदर्शनास आणून देऊ इच्छीतो कि तामिळनाडू राज्य विधी सेवा समिती आणि सल्लागार मंडळाकडून या प्रक्रियेचे अवलंबन केला जात असल्यामुळे तुरुंगातील कैद्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होत आहे.

5. महिला कैद्यांना पोलीस कोठडीत संरक्षण कसे देता येईल या प्रश्नावर आता आपण विचार करू. सुनावणीदरम्यान याचिकाकर्ता आणि महाराष्ट्र सरकारच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांना आम्ही सुनावणी दरम्यान अनेक सूचना केल्या आणि न्यायालयात अर्थपूर्ण आणि रचनात्मक चर्चा झाली. पोलीस कोठडीत असलेल्या महिला कैद्यांच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वे आखण्याकरीता महाराष्ट्र सरकारने न्यायालयाला पूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे आणि आम्ही केलेल्या बहुतांश सूचनांचा महाराष्ट्र सरकारने स्वीकार केला आहे. आमच्या समक्ष वाद प्रश्नाच्या

संदर्भात विविध पैलूंवर झालेल्या अर्थपूर्ण व रचनात्मक विवादाच्या निकालासंदर्भात आम्ही खालील प्रमाणे निर्देश देण्याचा प्रस्ताव ठेवू इच्छितो.

(i) आम्ही असे निर्देश देऊ की जेथे केवळ महिला संशयितांनाच ठेवले जावे अश्या वाजवी चांगल्या सुविधां असलेल्या चार किंवा पाच कोठड्यांची चांगल्या वस्तीत निवड केली जावी आणि त्याला महिला शिपायांचे संरक्षण असावे. संशयित पुरुषांना ज्या पोलीस कोठडीत ठेवले जाते, त्या पोलीस कोठडीत महिला संशयितांना ठेवण्यात येऊ नये. महाराष्ट्र सरकारने आम्हाला कळवले आहे की, जिथे महिला संशयितांना ठेवण्यात आले आहे तेथे आधीच तीन कोठड्या आहेत आणि महिला शिपायांद्वारे त्यावर पहारा ठेवण्यात येतो आणि अशाच प्रकारच्या व्यवस्थेसह आणखी दोन कोठड्या केवळ महिला संशयितांसाठी उपलब्ध केल्या जातील असे आश्वासन न्यायालयाला दिले आहे.

(ii) महिला पोलीस अधिकारी/शिपाईच्या उपस्थितीतच महिलांची चौकशी करण्यात यावी असे निर्देश आम्ही देऊ.

(iii) जेव्हा एखाद्या व्यक्तीला पोलिसांनी वॉरंटशिवाय अटक केली आहे, तेव्हा त्याला त्याच्या अटकेचे कारण तात्काळ कळविण्यात आले पाहिजे आणि आणि प्रत्येकवेळी अटक झाल्यानंतर अटकेतील व्यक्तीला त्याला जामिनासाठी अर्ज करण्याचा अधिकार आहे हे ताबडतोब कळवले पाहिजे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा समिती आणि सल्ला मंडळाने अटक केलेल्या व्यक्तीचे कायदेशीर हक्क दर्शविणारी एक पत्रिका ताबडतोब तयार करावी आणि महाराष्ट्र राज्य या पत्रिकेच्या मराठी जी महाराष्ट्रातील लोकांची भाषा आहे अश्या भाषेत तसेच हिंदी आणि इंग्रजी भाषेत पुरेशा प्रमाणातप्रती छापून त्या पत्रिकेच्या छापील प्रती प्रत्येक पोलिस कोठडीच्या प्रत्येक कक्षात चिटकवाव्या तसेच अटक केलेल्या व्यक्तीला पोलीस ठाण्यात आणल्या नंतर लगेच तीन भाषांपैकी

त्याला समजेल अश्या कोणत्याही भाषेत वाचून दाखवाव्या.

(iv) आम्ही असेही निर्देश देऊ इच्छितो कि जेव्हा एखाद्या व्यक्तीला पोलिसांद्वारे अटक करण्यात येते व कोठडीत ठेवण्यात येते तेव्हा त्या अटकेची माहिती जवळच्या विधी सेवा समितीला देण्यात यावी आणि अटकेतील व्यक्ती सदर विधी सेवा समितीद्वारे कायदेशीर मदत स्वीकारण्यास तयार असेल तर सदर विधी सेवा समितीद्वारे त्या व्यक्तीला सरकारी खर्चाने कायदेशीर मदत पोहचविण्याकरिता आवश्यक पाऊले उचलण्यात यावी. या दिशेने काम करण्यासाठी संबंधित विधी सेवा समितीला राज्य सरकारमार्फत आवश्यक निधी पुरविण्यात येईल.

(v) आम्ही असे निर्देश देऊ इच्छितो कि मुंबई शहर दिवाणी न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी नामनिर्देशित केलेल्या शहर सत्र न्यायाधीशांनी, विशेषतः जर महिला न्यायाधीश असतील तर, अटक केलेल्या व्यक्तींना त्यांच्या तक्रारी मांडण्याची संधी मिळावी आणि पोलीस कोठडीतील स्थिती काय आहेत आणि कायद्याच्या तरतुदींचे पालन केले जात आहे की नाही, आवश्यक सुविधा पुरविल्या जात आहेत की नाही आणि आम्ही दिलेल्या निर्देशांचे पालन होते आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी त्यांनी नियमितपणे शहरातील पोलिस कोठडीला अचानक भेट द्यावी. तपासणीअंती पोलीस अधिकाऱ्यांकडून काही त्रुटी आढळल्यास, शहर सत्र न्यायाधीश त्या पोलिस आयुक्तांच्या निदर्शनास आणून देतील आणि आवश्यक असल्यास गृह विभागाच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि हा दृष्टीकोन अयशस्वी ठरल्यास शहर सत्र न्यायाधीश महाराष्ट्राच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचे सदर त्रुटींकडे लक्ष वेधून घेतील. जिल्हा मुख्यालय पोलिस कोठडीसंदर्भातील सदर निर्देशांचे पालन संबंधित जिल्ह्याच्या सत्र न्यायाधीशांकडून झाले पाहिजे.

(vi) आम्ही असे निर्देश देऊ इच्छितो कि एखाद्या व्यक्तीला अटक केल्यावर बरोबर, पोलिसांनी तत्काळ त्याच्या कोणत्याही नातेवाईकाचे किंवा मित्राचे नाव ज्यांना त्याला

त्याच्या अटकेची माहिती देण्याची इच्छा आहे असे नाव त्याच्याकडून घ्यावे आणि पोलिसांनी त्याच्या अशा नातेवाईकाशी किंवा मित्राशी संपर्क साधून त्याच्या अटकेची माहिती त्यांना द्यावी.

(vii) आम्ही असे निर्देश देऊ इच्छितो की अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला ज्या दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाते, त्यांनी अटक केलेल्या व्यक्तीला पोलीस कोठडीत अत्याचार किंवा गैरवर्तणुकीची तक्रार आहे का, याची चौकशी करावी आणि त्याला कलम ५४ दंड प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत वैद्यकीय तपासणी करण्याचा अधिकार असल्याचे कळवावे. आम्हाला माहित आहे की कलम ५४ दंड प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत वैद्यकीय व्यावसायिकाद्वारे अटकेतील व्यक्तीची तपासणी त्या व्यक्तीच्या विनंतीवरून करण्याची तरतूद आहे आणि हा अटक केलेल्या व्यक्तीला बहाल केलेला अधिकार आहे. परंतु बरेचदा अटक केलेल्या व्यक्तीला या अधिकाराची जाणीव नसते आणि जरी पोलिस कोठडीत त्याचा छळ केला गेला असला किंवा त्याच्या बरोबर दुर्व्यवहार केला गेला असेल तरी त्याच्या अश्या अज्ञानामुळे तो हा अधिकार वापरू शकत नाही. या कारणास्तव आम्ही दंडाधिकारी यांना असे विशिष्ट निर्देश देत आहोत की अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला पोलीस कोठडीत छळ किंवा दुर्व्यवहाराची कोणतीही तक्रार असल्यास त्याला वैद्यकीय तपासणीच्या अधिकार आहे याची माहिती द्यावी.

6. याबाबत आम्हाला कोणतीही शंका नाही कि जर आम्ही दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले तर पोलीस कोठडीत असलेल्या कैद्यांना पुरेसे संरक्षण मिळेल आणि त्यांना त्यांच्या होणाऱ्या संभाव्य छळ किंवा गैरवर्तणुकीपासून वाचवले जाईल. या आदेशानुसार रिट याचिका निकाली काढण्यात आली .

" अस्वीकरण "

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."